SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

(असाधारण)

शुक्रवार, दिनांक १५ जानेवारी, २०२१

अधिसूचना

क्रमांक : १०/२०२१ दिनांक : १५.०१.२०२१

विषय : शैक्षणिक सत्र २०२०-२१ करीता सर्व सत्र / वर्षातील सर्व पदवी / पदव्युत्तर (पदवी व पदविका) अभ्यासक्रमास (शासनाकडून प्रवेश देण्यात येणाऱ्या अभ्यासक्रम वगळून) प्रवेश देण्याची अंतिम तिथीबाबत..

संदर्भ : १. विद्यापीठ निदेश क्र.१२/२०२०, दि.४.८.२०२० (परीच्छेद क्र.३ (vi) व
निदेश क्र.१७/२०२०, दि.१५.१०.२०२० (परीच्छेद क्र.३)
२. विद्यापीठ अधिसूचना क्र.१०९/२०२०, दि. ७.१२.२०२०
३. विद्यापीठ अधिसूचना क्र.११७/२०२०, दि. ३१.१२.२०२०

ज्याअर्थि, उपरोक्त संदर्भांकीत अधिसूचना अन्वये विद्या परीषदेने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठीय शैक्षणिक विभाग, मॉडेल डिग्री कॉलेज व संलग्नित महाविद्यालयातील सर्व सत्र / वर्षातील सर्व पदवी /पदव्युत्तर (पदवी व पदविका) अभ्यासक्रमातील सत्र २०२०-२१ करीता प्रवेश देण्याची अंतिम तिथी १५ जानेवारी, २०२१ पर्यंत अधिसूचित करण्यात आली आहे.

आणि

ज्याअर्थि, कोव्हीड-१९ च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे परीक्षांचे आयोजन व निकालावर परिणाम झाल्याने व दि.१५ जानेवारी, २०२१ रोजी ग्रामपंचायत निवडणुक असल्याने.

आणि

ज्या अर्थी, काही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विभागात / महाविद्यालयात प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरुच आहे. त्याबाबत वरील स्थितीचा विचार करता मा. कुलगुरुंनी विद्या परीषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम १२(७) अंतर्गत प्रवेश देण्यासाठी अंतिम तिथीत वाढ केली आहे.

त्यानुसार सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, विद्यापीठीय शैक्षणिक विभाग, मॉडेल डिग्री कॉलेज व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सर्व सत्र / वर्षातील सर्व पदवी /पदव्युत्तर (पदवी व पदविका) अभ्यासक्रमातील सत्र २०२०-२१ करीता प्रवेश देण्याची अंतिम तिथी २५ जानेवारी, २०२१ पर्यंत राहील.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ